# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

### गुरुवार, दिनांक १२ डिसेंबर, २०१९ / अग्रहायण २१, १९४१ (शके)

**१४४.** म.वि.प. नियम २८९ अन्वये प्रस्तावाच्या सूचना **ऑनलाईन (Online)** पध्दतीने स्वीकारण्याबाबत सर्व सन्माननीय विधानपरिषद सदस्यांना कळविण्यात येते की :-

मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार या सचिवालयाचे कार्यालयीन कामकाज अचूक व जलद गतीने होण्यासाठी तसेच कागदांचा कमीत कमी वापर व्हावा, यादृष्टीने म.वि.प. नियम २८९ अन्वये प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्यांकडून **ऑनलाईन (Online)** पध्दतीने सन २०१९ चे चौथे (हिवाळी) अधिवेशनात **www.mls.org.in** या संकेत स्थळावर स्वीकारण्यात येतील. त्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

(१) महाराष्ट्र विधानपरिषद सभागृहाच्या कामकाजाच्या दिवशी म.वि.प. नियम २८९ सूचना कार्यालयीन वेळेत म्हणजेच सकाळी ९.१५ वाजल्यापासून स्वीकारण्यात येतील व विधानपरिषद सभागृहाची नियमित बैठक सुरु होण्यापूर्वी एक तास अगोदर सूचना स्वीकारणे बंद करण्यात येतील तसेच प्राप्त होणाऱ्या सूचनांना संगणकीय प्रणालीद्वारे स्वयंचलित नोंदणी अनुक्रमांक दिला जाईल.

(२) म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना पूर्णत: **(Web portal)** मध्ये ऑनलाईन **(Online)** पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी त्याच विषयाची पुनरावृत्ती करणारी सूचना ऑफलाईन **(Offline)** पध्दतीने दिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही.

(३) म.वि.प. नियम २८९ अन्वये प्रस्तावाच्या सूचनेचा विषय हा निकडीच्या सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, एकाच विभागाशी संबंधित, मुद्देसूद व थोडक्यात ठेवून सूचनाधीन विषयाचा सारांश ८ ते १० ओळींमध्ये असणे आवश्यक आहे तसेच सूचनेस अनुमोदन देणाऱ्या मा.सदस्यांचा क्रम देखील देण्यात यावा.

(४) म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना स्वीकृती संबंधी व स्वीकृत सूचना चर्चेला घेण्यासंबंधीचा पूर्ण अधिकार मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचा राहिल.

**विधान भवन,**
**नागपूर.**
**दिनांक : १२ डिसेंबर, २०१९**

**राजेन्द्र ग. भागवत**
**सचिव (कार्यभार)**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

**याची प्रत :**

(१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य
(२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव
(३) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
(४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष
(५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
(६) संगणक कक्ष
(७) एम.के.सी.एल. प्रशिक्षण विभाग